
# दि रीडिंग क्लब' उपक्रम अहवाल- कार्यक्रम क्र. ३

**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

दि. **११ जुलै २०२५ (शुक्रवार)** रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या *'दि रीडिंग क्लब'* या उपक्रमांतर्गत **जागतिक लोकसंख्या दिन** या विशेष दिनाचे औचित्य साधून *"भारतीय लोकसंख्या वाढ : विकासातील आव्हाने व संधी"* या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचे सादरीकरण **डॉ. महेंद्र भिमराव भगत**, शैक्षणिक संयोजक, समाजशास्त्र यांनी केले. हा कार्यक्रम दुपारी ४.०० वाजता विद्याशाखेच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमास शैक्षणिक संयोजक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



डॉ. भगत यांनी आपल्या व्याख्यानात भारतातील लोकसंख्या वाढीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्याचे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय परिणाम यावर सखोल चर्चा केली. त्यांनी लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणारी आव्हाने जसे की बेरोजगारी, संसाधनांवरील ताण, शहरीकरणाची समस्या यांचे विश्लेषण केले. त्याचबरोबर लोकसंख्या वाढ ही विकासासाठी संधी कशी ठरू शकते यावरही त्यांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मुद्देसूद विचार मांडले. व्याख्यानादरम्यान उपस्थित शिक्षक व समुपदेशकांनी लोकसंख्या नियंत्रण, शाश्वत विकास, आणि समाजजागृती याबाबत चर्चा केली. विशेषत: भारतातील तरुण लोकसंख्येची क्षमता योग्य दिशेने वळवल्यास देशाच्या प्रगतीत कशी मदत होऊ शकते, यावर त्यांनी भर दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींसोबत प्रश्नोत्तरे व मुक्त चर्चा घेण्यात आली. सर्वांनीच व्याख्यानाचे कौतुक केले आणि *दि रीडिंग क्लब*अंतर्गत अशा समाजजागृतीपर उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची गरज व्यक्त केली. एकूणच, *"भारतीय लोकसंख्या वाढ : विकासातील आव्हाने व संधी"* या विषयावरील व्याख्यानाने सर्व सहभागींच्या मनावर विचारप्रवर्तक ठसा उमटवला. हा उपक्रम शैक्षणिक व वैचारिक दृष्टिकोन समृद्ध करणारा ठरला.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक